मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई 400025

## प्रिय कुलबांधव व भगिनींना सस्नेह नमस्कार.



मराठे प्रतिष्ठान विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळ, आणि वैयक्तिक माझ्यातर्फे आपल्या सर्वांना गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

मागील वर्षीचा गुढीपाडवा लॉकडाऊन सुरु होताच आल्याने, आधीच रवाना केलेली गुढीपाडवा शुभेच्छापत्रे बऱ्याच जणांना खूप उशिराने मिळाली तर काहींना पोहोचलीच नाहीत. एकंदर परिस्थिती लक्षात घेता यापुढे पत्रव्यवहार तसेच आपले लाडके त्रैमासिक हितगुज आपल्या पर्यंत पोहोचविणे दिवसेंदिवस अशक्य होत जाणार आहे. आपले संकेतस्थळ आणि व्हॉट्सॲप यासारखी माध्यमे उपलब्ध असल्याने हितगुजचे गतवर्षीचे 4 ही अंक आपल्यापर्यंत पोहोचवता आले. आपण नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहोत व त्यात आपल्याला आपल्या सभासदांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे.त्यामुळे जरी सर्व स्थिरस्थावर झाले तरी संकेतस्थळ आणि किंवा इतर उपलब्ध डिजीटल माध्यमातूनच आपल्याला संवाद सुरु ठेवणे यापुढे अगत्याचे झाले आहे. या कारणानेच मी पुनःश्च एकदा आवाहन करतो की ज्या सभासदांनी आपले इमेल आयडी आणि व्हॉट्सॲप नंबर पाठवले नसतील त्यांनी ते कार्यवाह हेमंत यांच्या ९८२२८५७७१२० या मोबाईल नंबरवर तातडीने पाठवून द्यावेत ही विनंती आहे.

कुलवृत्तांताचे संगणकीय नुतनीकरण करण्यात येत आहे. 2019 च्या मध्यावर या कामास प्रारंभ करण्याचा मानस होता. परंतु *Software Developer* च्या व्यस्ततेमुळे या प्रकल्पात अपेक्षित तेव्हढी प्रगती होऊ शकली नव्हती. काही विशेष प्रगती होत नसल्याने नाईलाजाने दुसऱ्या *Software Developer* चा शोध सुरु करावा लागला. वंशावळ हा कुलवृत्तांताचा गाभा असतो. त्यामुळे ती

सुविधा उपलब्ध करून देणाऱ्याच्या निवडीसाठी बराच काळ गेला. त्यानंतर २०२० च्या तिसऱ्या तिमाहीत या कामाला सुरवात झालीही होती. परंतु त्यांच्या कार्यालयातील ३/४ व्यक्तींना कोविड झाल्याने हे काम थोडे रेंगाळले. आता नव्या जोमाने पुन्हा सुरुवात केली आहे आणि या वर्षीच्या दिवाळीपर्यंत तरी आपल्याला आपल्या *Online* कुलवृत्तांतात आपापली माहिती भरता यावी यासाठी कुलवृत्तांतसमितीचे प्रमुख या नात्याने पूर्व कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास यांचे प्रयत्न चालू आहेत.

२६ जानेवारी २०२१ रोजी पुणे येथे मराठे प्रतिष्ठान ची वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच पुणे शाखा वर्धापनदिनाचा कार्यक्रम साजरा केला गेला. कोरोना चा प्रादुर्भाव झाल्या मुळे सर्व निर्बंध होते, तरीसुध्दा जवळपास ६० सभासद उपस्थित होते. श्री प्रमोद मराठे संचालक गंधर्व महाविद्यालय आपल्या वडिलांच्या जन्म शताब्दी चे औचित्य साधून आपल्या कुळाकरिता काही कार्य करायची ईच्छा प्रकट केली. गायन,वादन शिक्षणा या कलांच्या विकासासाठी आर्थिक सहकार्य देण्याची तयारी दर्शवली. आपलेच कुलबांधव श्री. गणेश मराठे यांनी सुश्राव्य भावगीते सादर केली. अशा उत्साहवर्धक वातावरणात वार्षिक सर्व साधारण सभेचा जणू विसरच पडला होता. मात्र नंतर प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात छान झाली. याचं मनापासून श्रेय नवनिर्वाचित पुणे शाखा कार्यकारिणीच्या महिला मंडळाला दिले पाहिजे. दीर्घकाळ पुणे शाखेचे नेतृत्व केलेल्या आणि अनुभवी अशा आपल्या सौ.निलांबरीताई यांचे योग्य ते मार्गदर्शन त्यांना मिळाले. सौ.मानसी गाडगीळ या मराठ्यांच्या माहेरवाशिणीने आणि तिच्या सहकारी मंडळींनी खुपच परिश्रम घेतले आणि आपल्यावर टाकलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

गतवर्षी कोरोना मुळे बरेच आर्थिक व्यवहार म्हणजे मुदतठेवींचे नुतनीकरण, आर्थिक मदतीच्या आणि पारितोषिकांच्या रकमा संबंधितांच्या खात्यात जमा करणे आदी कामे आपले कोषाध्यक्ष श्री. अनंत मराठे यांनी या लॉकडाऊन च्या काळातही कौशल्याने पार पाडली. त्यांना मार्गदर्शन आणि शक्य ती मदत पूर्व कोषाध्यक्ष श्रीनिवास, कार्यवाह हेमंत आणि कार्योपाध्यक्ष शैलेंद्र यांनी केली. सर्व विश्र्वस्त आणि मी केवळ सांगतील तशी योग्य ती साथ दिली. ही खरोखरच एक कौतुकास्पद कामगिरी आहे. काळानुसार बदल होत असतात त्याला अनुभवच मदत करतो.
गतवर्षी कोरोना मुळे गणेशोत्सव सजावट स्पर्धेत फारच कमी प्रतिसाद मिळाला. पण यावर्षी जास्तीत जास्त सभासद भाग घेतील अशी आशा करतो.

सन २०२०, आपल्या सर्वांच्या लक्षात राहील अशा कोरोना च्या भयानक वातावरणात, कसं संपलं हे सर्वांनाच माहीत आहे. हे कोरोनाचे सावट गेले वर्षभर आहे. या वर्षीही अजून किती काळ या दिव्यातून आपल्याला जावे लागणार आहे ही टांगती तलवार सर्वांच्याच डोक्यावर आहे. आपल्यापैकी काहींना व्यवसायात आर्थिक तुटीचा सामना करावा लागला असेल. काहींच्या नोकऱ्याही गेल्या. मध्यंतरी कमी झालेला आणि जवळजवळ नाहीसा झालेला कोरोनाचा प्रकोप आता जास्तच वाढत चालला आहे. आणि यावेळी होत असलेली वाढ भयावह आहे.

समाधानकारक बाब ही आहे की आता त्यावर लस ऊपलब्ध आहे. आणि ६० वर्षे वयावरील आपल्या पैकी बऱ्याच जणांनी ही लस टोचून घेतली असेलच. आतातर ४५ वर्षांवरील सर्व व्यक्तींसाठी लसीकरण मोहीम खुली केली आहे. त्यानंतर २५ वर्षांवरील व्यक्तींसाठी देखील लसीकरण उपलब्ध होईल. आपल्या वयोगटानुसार प्रत्येकाने ही लस टोचून घ्यावी. कारण लसीकरण हाच या रोगावरील प्रभावी उपाय असल्याचे सध्यातरी संकेत आहेत. असे करून आपण सर्वांनी अप्रत्यक्षपणे एका राष्ट्रकार्याला हातभार लावूया !

गेल्या वर्षभरात जवळपास ७० नवीन सभासद झाले त्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन. तसेच ज्या कुलबांधवांनी आणि भगिनींनी आपणास देणगी दिली त्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन. मी परत एकदा सर्व कुलबांधव आणि भगिनींना आवाहन करतो की जे सभासद नाहीत त्यांनी लवकरात लवकर सभासदत्व स्वीकारून आपल्या संस्थेला यथायोग्य आर्थिक सहाय्य केले तर चांगले होईल.
येणारा काळ फारच कठीण आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव समूळ नष्ट होवो आणि परत आपण सर्वजण नव्या जोमाने आपापल्या कामाला सुरुवात करोत हीच सदिच्छा.

आपला.
विजय मराठे
कार्याध्यक्ष
मराठे प्रतिष्ठान